प्रकरण चार

# ९ वी, १० वीच्या 'कुमारभारती' या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण

## प्रकरण ४ थे

## इयत्ता ९ वी, १० वीच्या ' कुमारभारती ' या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण


| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| ४.१ | प्रास्ताविक | 62 |
| ४.२ | भारतातील शिक्षण आयोगांची आणि शिक्षण मंडळाची मूल्यशिक्षणातील भूमिका. | 63 |
| ४.३ | मूल्यशिक्षणात अभ्यासक्रम पुस्तिकेचे अवलोकन | 65 |
| ४.४ | इयत्ता ९ वीच्या ' कुमारभारती ' या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण | 67 |
| ४.५ | इयत्ता १० वीच्या ' कुमारभारती ' या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण | 75 |
| ४.६ | समारोप | 85 |

<u>प्रकरण ४ थे</u>

## इयत्ता ९ वी, १० वीच्या 'कुमारभारती' या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण

### ४.१ प्रास्ताविक :

स्वर्गीय डॉ. राधाकृष्णन शिक्षणाचा मुख्य हेतू स्पष्ट करताना म्हणतात -

> "we are building civilisation, not a building or a factory. Civilisation depends not upon material equipment or political machinery, but upon the human character so, the major task of our education is improvement of character."[1]

मूल्यसंवर्धन हा चारित्र्य बांधणीचा पाया ठरतो. संस्कृतीच्या बांधणीसाठी चारित्र्य संवर्धनाची डॉ. राधाकृष्णन यांनी प्रतिपादलेली गरज आणि त्या संदर्भातील 'शिक्षण' एक साधन म्हणून शिक्षणाची भूमिका विचारात घेतली म्हणजे, ज्या पाठ्यपुस्तकांच्या आधारे विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे त्या पुस्तकांच्या निर्मितीकडे, निर्मितीच्या उद्दिष्टांकडे निर्मिती प्रक्रियेकडे, आणि प्रतिपादलेली उद्दिष्टे सिद्धीस गेलीत की नाहीत या मूल्यमापनात्मक बाबींकडे आपल्याला लक्ष द्यावे लागते.

निसर्गातील मानवी प्राण्याचे वैशिष्ट्य हे आहे की, तो विचार करतो. सुखी होण्यासाठी अव्याहतपणे धडपडतो. आधुनिक युगातील त्या त्या देशातील शैक्षणिक आयोगांचे अवलोकन केले असता सुखाकडे आणणारा मानवाचा प्रयास अधोरेखित होतो. मूल्यसंवर्धनाला देशोदेशीच्या

शैक्षणिक आयोगांमध्ये मूल्यांना महत्त्व दिलेले आपल्याला पहावयास मिळते. कारण आपण ` माणूस ` आहोत याचे भान अद्यापी माणसाने सोडलेले दिसत नाही.

` मूल्य संकल्पना ` ला भारतीय शिक्षण आयोगांनी कशा पध्दतीने महत्त्व देत आलेले आहे याचे अवलोकन प्रथम केले आहे. कारण शिक्षण आयोगाच्या धोरणानुसार पाठ्यपुस्तकांची निर्मिती होत असते.

## ४.२ भारतातील शिक्षण आयोगांची व शिक्षण मंडळांची मूल्यशिक्षणातील भूमिका :

### विद्यापीठ शिक्षण आयोग - १९४८

` सामाजिक जीवनाची नैतिक व आध्यात्मिक पातळी उंचावणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.'[2]

### माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३)

शिक्षणाद्वारे (१) चारित्र्य विकास, (२) बौध्दिकक्षमता संपादन आणि (३) सामाजिक न्यायाकरिता दृष्टी निर्माण व्हावी असे म्हणून मूल्यशिक्षणाच्या संदर्भात आपल्या प्रतिवृत्तामध्ये मुदलियार आयोग म्हणतो,

> "One of the dominant aims of the school will be to educate the character and inculcate the right kinds of ideas and values in the students. Schools should be earnestly interested in moral and social training."[3]

## विद्यापीठ आयोग (१९४८) आणि
## माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३)

या आयोगांमधून शिक्षण करून नैतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक मूल्यांवर अधिक भर दिला असल्याचे दिसून येते. श्रीप्रकाश कमिटीने देखील मूल्यांच्या संवर्धनात अशीच ओढा व्यक्त केली आहे.

> "It is essential that from the earliest childhood moral values should be inculcated in us.
>
> If the content of education is enriched with moral and spiritual values, the purpose of education will be truly served."[4]

कोठारी शिक्षण आयोगाने (शिक्षण आणि राष्ट्र विकास - १९६६) तर शिक्षणातून राष्ट्र विकास साधत असताना राष्ट्रीय उद्दिष्टांमध्ये नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणाला स्थान दिले आहे.[5]

१९८६ च्या नवीन शैक्षणिक आयोगामध्ये देखील मूल्य-शिक्षणाची आवश्यकता नोंद करून त्यावरील उपाययोजनांची सुचवली आहे. (पहा प्रकरण १ ले, पृष्ठ क्र. 2 )[6]

नैतिक सामाजिक मूल्यांची आवश्यकता विविध शिक्षण आयोगांनी आणि मंडळांनी मांडताना कोणती नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवायची याबद्दल सूचना केलेल्या आहेत. या सर्वांचे परिशिष्ट 'एन.सी.ई.आर.टी.' ने करून "Documents on social moral and spiritual values in education (1979) या पुस्तिकेमध्ये ८४ मूल्यांची यादी दिलेली आहे.[7]

महाराष्ट्रामध्ये, औरंगाबाद येथे नैतिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी राज्यस्तरीय चर्चासत्र ऑगस्ट १९८१ मध्ये घेण्यात आलेले आहे. या चर्चासत्रामध्ये येथील १२ नैतिक मूल्यांचा शालेय अभ्यासक्रमासाठी स्वीकार केला आहे.

जून १९८३ मध्ये दिल्ली, येथे झालेल्या सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या बैठकीमध्येही ` धर्मनिरपेक्षता, सह-अस्तित्व आणि सामंजस्य ` ही मूल्ये विद्यार्थ्यांवर बिंबविली जातील अशा शिक्षण-पद्धतीची मागणी केली आहे.

४.२ <u>मूल्यसंदर्भात अभ्यासक्रम पुस्तिकेचे अवलोकन</u> :

भारतातील शिक्षण आयोगांनी आणि मंडळांनी मूल्य-शिक्षणाच्या संदर्भात विशेष भर अवलंबन केला. मानवाची भौतिक प्रगती कितीही झाली, तरी मूल्ये त्याच्या मानसिक, आत्मिक उन्नतीचे कार्य करणार असल्यामुळे भौतिक प्रगतीच्या या राक्षसी वाढीमध्ये मूल्यशिक्षण ही अनिवार्य बाब ठरली आहे. आता ९ वी, १० वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणारी पाठानुरूप मूल्ये, त्यांचे वर्गीकरण विश्लेषण खाली केले आहे. हे विश्लेषण योग्य मार्गाने व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ९ वी, १० वीच्या मराठी (प्रथम भाषा) अध्यापनाची मूल्यशिक्षणाच्या संदर्भात कोणकोणती उद्दिष्टे ठरवलेली आहेत ते पाहिले आहे. त्या योगे उद्दिष्टानुरूप पाठ्यपुस्तकांची निर्मिती झाली आहे की नाही हे पाहता येईल.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे महाराष्ट्र राज्य यांनी प्रकाशित केलेली इयत्ता ८, ९, १० वीची ही अभ्यासक्रम

पुस्तिका आहे (१९७२) तीमध्ये प्रथम भाषा म्हणून मराठी भाषेच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे देताना, "भाषा हे विचारांच्या आदानप्रदानाचे माध्यम असल्यामुळे यातील आशय असा निवडला गेला पाहिजे की विद्यार्थ्यांमध्ये जीवनविषयक योग्य वृत्ती आणि सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांची जोपासना होईल." असे सांगून विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट क्षमता विकसित करण्यास एकूण बारा उद्दिष्टे सूचित केलेली आहेत. त्यापैकी मूल्य-शिक्षणाच्या संदर्भातील उद्दिष्टांची नोंद येथे केली आहे. प्रथम अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये ती ९, १०, ११, १२ अशा अनुक्रमाने आलेली आहेत ती खालील-प्रमाणे :

"९. विचार नोंदलेले अहवाल, पत्रे, निबंध, संवाद, मुलाखती, गोष्टी यांसारखी सुवाच्य व चांगल्या अक्षरात प्रमाणित भाषेत लिहिणे.

१०. साहित्याच्या विविध प्रकारांचा व त्यांचा परिचय होऊन साहित्याबद्दल चांगली अभिरुची, प्रेम निर्माण होणे.

११. भाषा आणि साहित्य यातील सौंदर्य जाणून रसास्वाद घेणे.

१२. स्वनिर्मिती करता येणे व सामाजिक सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची जाण असणे."[१८]

ही उद्दिष्टे देऊन अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये उद्दिष्टांच्या खाली टीप दिलेली आहे. ती अत्यावश्यक म्हणून येथे दिली आहे.

"टीप - वरील उद्दिष्टे अध्ययन-अध्यापनात विविध साधनांचा वापर करून साध्य करता येतील. पाठ्यपुस्तक हे या साधनांपैकी एक महत्त्वाचे साधन होय. वर्गातील परिस्थिती लक्षात घेऊन योग्य अध्यापन पद्धतीचा

उपयोग करणे उद्दिष्ट पूर्तीच्या दृष्टीने आवश्यक आहे. वरीलपैकी बऱ्याच उद्दिष्टांची पूर्ती झाली आहे किंवा नाही हे लेखी परीक्षेच्या साहाय्याने समजत येऊ पण तोंडी आविष्कार, वर्तनातील बदल इत्यादींद्वारे उद्दिष्टे शिक्षकाला वर्गात समजावी जाणतील."[1]

याच अर्थ उद्दिष्ट पूर्ती करताना पाठ्यपुस्तकांच्या मर्यादा शिक्षण मंडळाने ओळखलेल्या आहेत. या मर्यादा ओळखून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अध्यापकाने काय करावे या संबंधात या टीपेमध्ये मार्गदर्शन केलेले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून ९ वी, १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांकडे मूल्यांच्या दृष्टिकोनातून पाहिलेले आहे.

४.४ इयत्ता ९ वीच्या `कुमारभारती` या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे विश्लेषण :

इयत्ता ९ वीच्या `कुमारभारती` या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होत असलेल्या मूल्यांचे विश्लेषण खाली केले आहे.

पाठांमधून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांनुसार पाठांची विभागणी सारणी क्र. ४.१ मध्ये केली आहे. त्यामुळे कोणती मूल्ये कोणत्या पाठातून प्रतिबिंबित होतात हे [illegible] समजून येईल.

सारणी क्र. ४.१

मूल्यांनुसार गद्य-पद्य पाठांची विभागणी

कुमारभारती – इयत्ता ९ वी

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | अन्यायाची चीड | गद्य | पी हिंग पाहिजे होता, ९ |
| | | पद्य | पवित्र मशाल, १० |

<u>सारणी क्र.४.१ (पुढे चालू...)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| २. | अस्पृश्यांबद्दल आदर | गद्य | माझी पर माझी माणसे, २० |
| | | गद्य | मृषिकीन, २१ |
| | | गद्य | सांकेत जायचे, २१ |
| ३. | आरोग्य | पद्य | रामराज्य, ४ |
| ४. | आत्मविश्वास | पद्य | भोत्याच चिमणी, ९ |
| ५. | आत्मबल | गद्य | सत्याग्रह म्हणजे काय ?, २ |
| ६. | आत्मसंरोपण | गद्य | सत्याग्रह म्हणजे काय ?, २ |
| | | गद्य | माझी पर माझी माणसे, २० |
| ७. | इतिहास प्रेम | गद्य | राज्य व्हावे ही श्रींची इच्छा, १४ |
| ८. | कर्तव्यनिष्ठा | गद्य | जर मरायचेच असेल तर देशासाठी, ३ |
| | | पद्य | तापला सूर्य, १४ |
| ९. | कनिष्ठांबद्दल आदर | पद्य | तू झालास मूक समाजाचा नायक, १६ |
| १०. | क्रियाशीलता | पद्य | मुराळी (काव्यानंद), १ |
| ११. | कौटुंबिक सामंजस्य | गद्य | स्वयंपाकीण काकू, ४ |
| | | गद्य | राज्य व्हावे ही श्रींची इच्छा, १४ |
| १२. | वैज्ञानिक जीवनदृष्टी | गद्य | स्वयंपाकीण काकू, ४ |
| | | गद्य | सेनापती बापट, ८ |
| | | गद्य | माझा अविस्मरणीय क्षण, २२ |
| १३. | अन्य धर्मांचा आदर | गद्य | बुवाबाजी आणि समाज, १८ |
| १४. | चारित्र्यसंपन्नता | गद्य | राजाचे शील, ११ |
| १५. | चिंतनशीलता | गद्य | स्वप्नातील प्रौढी कशी येईल, १ |
| १६. | चिंतामुक्ती | पद्य | स्वयंपाकीण काकू, ४ |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू....)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| १७. | जनजागरण, करुणा | गद्य | मी सिंह पाहिला होता, ९ |
| | | गद्य | शाळा, १६ |
| | | गद्य | बुवाबाजी आणि समाज, १८ |
| | | गद्य | भूमिहीन, २१ |
| १८. | जीवन जिज्ञासा | गद्य | मी सिंह पाहिला होता, ९ |
| १९. | तारतम्यभाव | गद्य | जर मरायचेच असेल तर देशासाठी, ३ |
| २०. | त्याग | गद्य | गोमटेश्वर, १५ |
| २१. | मातृत्व | गद्य | राजाचे शील, ११ |
| २२. | निसर्ग प्रेम | गद्य | मी जीवनाचा उपासक, ७ |
| | | गद्य | शिवकुमाराचा पक्षा, १३ |
| | | पद्य | संध्यारमणी, ६ |
| | | पद्य | आकाशवेडी, ९ |
| | | पद्य | सकाळ, ११ |
| | | पद्य | किमया, १२ |
| | | पद्य | माझी मी पण गाऊन गावे, १३ |
| | | पद्य | सिकन, १७ |
| २३. | निःस्वार्थ | गद्य | मी सिंह पाहिला होता, ९ |
| | | गद्य | मानवताधर्म, १० |
| २४. | न्यायनिष्ठा | पद्य | रामराज्य, ४ |
| २५. | परमतादर | गद्य | मानवताधर्म, १० |
| २६. | परोपकार | गद्य | उर्वीच्या कुशी पेटल्या, १७ |
| | | पद्य | रामराज्य, ४ |
| २७. | प्रतिकूली पराङ्मुखता | पद्य | दाट डोंगरी राहती, ७ |

<u>सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| २८. | प्रेम | गद्य | सत्याग्रह म्हणजे काय ?,२ |
| | | गद्य | कष्टाळू स्त्री, ६ |
| | | गद्य | स्वर्गवासीण काकू, ४ |
| | | गद्य | राजाचे शौर्य, ११ |
| | | पद्य | पवित्र ममता, १० |
| २९. | बंधुता | गद्य | मानवताधर्म, १० |
| | | पद्य | माझिया माहेरा जा, ८ |
| ३०. | भूतदया | गद्य | सोनाळी, १२ |
| ३१. | मनोधैर्य | गद्य | कष्टाळू स्त्री, ६ |
| | | गद्य | सेनापती बापट, ८ |
| | | गद्य | मी शिव पाहिला होता, ९ |
| | | गद्य | माझा अविस्मरणीय क्षण, २२ |
| ३२. | मनोनिर्धार | गद्य | जर मनात असेल तर देशासाठी, ३ |
| | | गद्य | माझे घर माझी माणसे, २० |
| ३३. | मातृभाषा प्रेम<br>मातृभूमी प्रेम | गद्य | स्वातंत्र्याची ज्योत कशी पेटली, १ |
| | | गद्य | सर्वांच्या ज्योती पेटल्या, १७ |
| | | पद्य | तापला सूर्य, १४ |
| | | पद्य | प्रिय हा भारत देश, ३ |
| ३४. | मानवता प्रेम | गद्य | स्वातंत्र्याची ज्योत कशी पेटली, १ |
| | | गद्य | सर्वांच्या ज्योती पेटल्या, १७ |
| | | पद्य | अभिवादन (काव्यानंद), २ |
| | | पद्य | तापला सूर्य, १४ |
| ३५. | मातृपितृ प्रेम | गद्य | माझे घर माझी माणसे, २० |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू....)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
| --- | --- | --- | --- |
| ३६. | राष्ट्रनिष्ठा | गद्य | जर मरायचेच असेल तर देशासाठी, ३ |
| | | गद्य | सेनापती बापट, ८ |
| | | गद्य | मी शिव पाहिला होता, ९ |
| | | गद्य | राज्य व्हावे ही श्रींची इच्छा, १४ |
| | | पद्य | प्रिय हा भारत देश (काव्यांश), ३ |
| ३७. | लोकशाही जीवनमार्ग | गद्य | भारतात लोकशाही नांदी, ५ |
| ३८. | विश्वबंधुता | गद्य | भारतात लोकशाही नांदी, ५ |
| ३९. | विनयशीलता | गद्य | राजाचे शील, ११ |
| | | पद्य | मोठी मी पण करून जावे, १३ |
| ४०. | विरक्ती | गद्य | गोमटेश्वर, १५ |
| | | पद्य | आवा चालली पंढरपुरा, ५ |
| ४१. | विज्ञाननिष्ठा | गद्य | जॉन ग्रेगर मेंडेल, १९ |
| ४२. | सत्यप्रियता | गद्य | सत्याग्रह म्हणजे काय, २ |
| | | पद्य | सत्यप्रियता, ४ |
| | | गद्य | जशास तसे, ६ |
| | | गद्य | राजाचे शील, ११ |
| | | पद्य | पवित्र भावना, १० |
| ४३. | सद्वर्तन | गद्य | सत्याग्रह म्हणजे काय १,२ |
| ४४. | सहनशीलता | गद्य | जर मरायचेच असेल तर देशासाठी, ३ |
| | | गद्य | माझा अविस्मरणीय क्षण, २२ |
| ४५. | [illegible] | गद्य | जर मरायचेच असेल तर देशासाठी, ३ |
| ४६. | समता | गद्य | मानवताधर्म, १० |
| ४७. | सदाचार | गद्य | राजाचे शील, ११ |
| ४८. | संशोधनवृत्ती | गद्य | जॉन ग्रेगर मेंडेल, १९ |
| ४९. | सामाजिक स्वच्छता | गद्य | सेनापती बापट, ८ |
| ५०. | सौंदर्याभिरुची | गद्य | मी जीवनाचा उपासक, ७ |

<u>सारणी क्र. ४.१ (पुढे चालू....)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| ५१. | स्वातंत्र्य | गद्य | भारतात लोकशाही नांदो, ५ |
| | | गद्य | सेनापती बापट, ८ |
| | | गद्य | मी शिंग पाडिला होता, ९ |
| | | गद्य | मानवता धर्म, १० |
| ५२. | सेवावृत्ती | गद्य | राजाचे [illegible], ११ |
| | | गद्य | शाळा, १६ |
| ५३. | शूरता | गद्य | गोमटेश्वर, १५ |
| ५४. | शिक्षक (गुरु) आदर | पद्य | संत नाम गाय, ३ |
| ५५. | श्रमनिष्ठा | गद्य | गोमटेश्वर, १५ |
| | | पद्य | पवित्र मजा, १० |

टीप : पाठांच्या नावांपुढे नोंदविलेले क्रमांक हे
पाठ क्रमांक आहेत.

वरील सारणी क्र. ४.१ वरून असे आढळून येते की 'कुमारभारती' इयत्ता ९ वीच्या पाठ्यपुस्तकामध्ये असलेल्या गद्य २३, पद्य १७, अध्यात्म ३ या एकूण ४३ पाठांमधून पंचावन्न मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत.

मूल्यांच्या प्रवृत्तींचा विचार करून मूल्ये खालील पाच प्रकारामध्ये विभागलेली आहेत.

१) वैयक्तिक मूल्ये
२) सामाजिक मूल्ये
३) नैतिक मूल्ये
४) सांस्कृतिक मूल्ये
५) आध्यात्मिक मूल्ये

मूल्यांचे हे प्रकार केवळ अभ्यासाच्या सोयीसाठी पाडलेले आहेत.

वरील मूल्य प्रकारांनुसार इयत्ता १ ली च्या ' कुमारभारती ' या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांतून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांची विभागणी केली आहे.

### सारणी क्र. ४.३

**इयत्ता १ ली च्या ' कुमारभारती ' या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांची मूल्यप्रकारानुसार विभागणी**

| | |
|---|---|
| १) वैयक्तिक मूल्ये : | आरोग्य संवर्धन, आत्मविश्वास, आत्मसंतुष्टी, आत्मपरीक्षण, कर्तव्यनिष्ठा, क्रियाशीलता, चिंतनशीलता, जिज्ञासूवृत्ती, स्वाभिमान, निःस्वार्थवृत्ती, प्रतिस्पर्धी पराङ्मुखता, मनोधैर्य, मनोनिर्धार, विनम्रशीलता, सहनशीलता, संयुक्तिक परखडपणा, संशोधनवृत्ती, सेवावृत्ती, शूरता, श्रमप्रतिष्ठा |
| २) सामाजिक मूल्ये : | अन्यायाची चीड, अंत्यजांबद्दल आदर, कर्मयोग्यांबद्दल आदर, कौटुंबिक सामंजस्य, जनजागरण, जनसेवा, परमतादर, परोपकार, राष्ट्रनिष्ठा, लोकशाही जीवनमार्ग, विज्ञाननिष्ठा, स्वच्छता |
| ३) सांस्कृतिक मूल्ये : | इतिहास प्रेम, उदार जीवनदृष्टी, सर्वधर्मांचा आदर, निसर्ग प्रेम, प्रेम, बंधुता, नम्रता, भावुकपणा, भूमी प्रेम, मातृ-पितृ प्रेम, विश्वबंधुता, समता, सौंदर्याभिरुची, स्वातंत्र्य, शिक्षक आदर, दातृत्व |

<u>सारणी क्र. ४.३ (पुढे चालू....)</u>

४) नैतिक मूल्ये : चारित्र्यसंपन्नता, न्यायनिष्ठा, सत्यप्रियता, सद्वर्तन, सदाचार

५) आध्यात्मिक मूल्ये : जीवनश्रद्धा, त्याग, मानवता प्रेम, विरक्ती

मूल्यांच्या पाच प्रकारानुसार विचार करता ९ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचे प्रमाण खालील सारणी क्र.४.३ मध्ये दाखविले आहे.

<u>सारणी क्र. ४.३</u>

९ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचे प्रकारानुसार शेकडा प्रमाण

| अनु. | मूल्य प्रकार | मूल्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वैयक्तिक मूल्ये | २० | ३६.५० टक्के |
| २. | सामाजिक मूल्ये | ११ | २०.०० टक्के |
| ३. | सांस्कृतिक मूल्ये | १५ | २५.०० टक्के |
| ४. | नैतिक मूल्ये | ५ | १०.५० टक्के |
| ५. | आध्यात्मिक मूल्ये | ४ | ८.०० टक्के |
| | एकूण मूल्ये | ५५ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ४.३ वरुन असे आढळून येते की, कुमारभारती इयत्ता ९ वी या पाठ्यपुस्तकांमध्ये वैयक्तिक मूल्ये (३६.५० टक्के) त्यानंतर सांस्कृतिक मूल्ये (२५ टक्के) व सामाजिक मूल्ये (२० टक्के) आहेत. नैतिक व आध्यात्मिक

मूल्यांना मात्र अनुक्रमे (१०.५० टक्के) व ८.०० टक्के एवढेच अल्पप्रमाण या पाठ्यपुस्तकामध्ये आढळले आहे.

वरील सारणी क्र. ४.३ मध्ये ९ वीच्या पाठ्यपुस्तकामध्ये नैतिक व आध्यात्मिक मूल्यांना कमी प्रमाण दिलेले आहे तरी, वैयक्तिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांच्या संवर्धनातूनच नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विकास होत असतो हे मान्य केले पाहिजे. तसेच ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करता (१४ ते १५ वर्षे) आध्यात्मिक मूल्यांपेक्षा वैयक्तिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांना दिलेले अधिक महत्त्व हे संयुक्तिक वाटते.

### ४.५ इयत्ता १० वीच्या `कुमारभारती` या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे वर्गीकरण :

इ. १० वीच्या `कुमारभारती` या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मुल्यांचे विश्लेषण खाली केले आहे.

या पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांनुसार पाठांची विभागणी सारणी क्र. ४.४ मध्ये केली आहे. त्यामुळे कोणती मूल्ये कोणत्या पाठातून प्रतिबिंबित होतात हे समजून येईल.

### सारणी क्र. ४.४

### मूल्यानुसार पाठांचे विश्लेषण

### इयत्ता १० वी - कुमारभारती

| अनु. | मूल्याचे नाव | प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | अहंकार त्याग | गद्य | वसू व डाग, ८ |
| | | पद्य | मी दे काठिण्य मागतो, १२ |
| | | पद्य | तहान, १८ |
| २. | अन्यायाची चीड | गद्य | बोलड, १९ |
| ३. | अतिरेक त्याग | पद्य | लोकवाणी, ४ |
| ४. | अंधश्रद्धा निर्मूलन | गद्य | माणसाची किंमत, १७ |
| ५. | आप्त प्रेम | गद्य | पाटी आणि पोळी, १६ |
| ६. | आत्मपरीक्षण | गद्य | किमया, १८ |
| | | पद्य | तुकारामाची अभंगवाणी, ३ |
| | | पद्य | ओळ,६ |
| | | पद्य | मी दे काठिण्य मागतो, १२ |
| ७. | आत्मविश्वास | पद्य | तो म-हाटी बोलिन, १ |
| ८. | आत्मनिर्भरता | गद्य | बोलड, १९ |
| ९. | उतिडाय प्रेम | गद्य | वनश्री सौजन्य, १५ |
| १०. | क्रांतिनिष्ठा | पद्य | क्रांतीचा जयजयकार, १४ |
| | | पद्य | अग्निवर नमि फडफडू दे (अभ्यासेतर), २ |
| ११. | क्रियाशीलता | पद्य | काठिण बहु मार्गात वदवता, ५ |
| १२. | कौटुंबिक जिव्हाळा | गद्य | कळोव, १० |
| १३. | कृतज्ञता | गद्य | पाटी आणि पोळी, १६ |
| १४. | डोळस जीवन दृष्टी | गद्य | तुम्ही आम्ही का हसतो ?, ५ |
| १५. | खोट्या प्रतिष्ठेचा तिरस्कार | गद्य | बोलड, १९ |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| १६. | चिरंतन सुख शोध | गद्य | भेट, १२ |
| १७. | अनभ्यास | गद्य | [illegible] |
| १८. | जीवननिष्ठा | पद्य | पाच दिवस, १६ |
| | | पद्य. | कृपानुबंध, २० |
| १९. | तत्परता | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| २०. | तपस्वीता | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| २१. | तेजस्वीता | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| २२. | वैज्ञानिक दृष्टी | गद्य | जनतेचे राज्य, १५ |
| २३. | त्यागनिष्ठा | गद्य | क्रांतीचा जयजयकार, १४ |
| २४. | दया | पद्य | ती श्रीकृष्णराजी सेय, २ |
| २५. | दुर्दम्य आत्मशक्ती | पद्य | क्रांतीचा जयजयकार, १४ |
| २६. | देशप्रेम | गद्य | आपेश मरणाहून वोखटे, १ |
| २६. | | गद्य | देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठा, ३ |
| २७. | ध्येयनिष्ठा | पद्य | क्रांतीचा जयजयकार, १४ |
| २८. | नवनिर्मितीक्षमता | पद्य | तो मऱ्हाटी चौकि, १ |
| | | पद्य | कुणाकुणा, ११ |
| २९. | निसर्ग प्रेम | गद्य | रानपिशीतला दिवस, १४ |
| | | पद्य | फुलराणी, ९ |
| | | पद्य | श्रावण, १५ |
| | | पद्य | शांत चंद्रोळी रात्र, १७ |
| ३०. | निष्काम सेवा | गद्य | देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठा, ३ |
| ३१. | न्यायनिष्ठा | गद्य | न्याय, १२ |

सारणी ३.४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| ३२. | परमेश्वर भक्ती | पद्य | श्री कृष्णराची भेट, २ |
| ३३. | परखडता | गद्य | केशवसुतांचे एक पत्र, ४ |
| ३४. | पारतंत्र्य त्याग | पद्य | लोकवाणी, ४ |
| ३५. | प्रोत्साहन वृत्ती | गद्य | केशवसुतांचे एक पत्र, ४ |
| ३६. | प्रवाहित वक्ता | गद्य | न्याय, १२ |
| ३७. | बुद्धिनिष्ठा | गद्य | जनतेचे राज्य, १५ |
| ३८. | भयमुक्ती | पद्य | बाळिरा बहु बायकांत बावळा, ५ |
| ३९. | भावसौंदर्य जाण | पद्य | कुणाकूणा, १३ |
| ४०. | भूतदया | गद्य | रोबिनशीलचा मित्र, १४ |
| | | | मिळण्या, १८ |
| ४१. | मनोनिग्रह | गद्य | देशभक्ती आणि राष्ट्रनिष्ठा, ३ |
| ४२. | मनोधैर्य | पद्य | दोन मित्र, १६ |
| ४३. | मनाचा मोठेपणा | पद्य | तुकारामाची अभंगवाणी, ३ |
| ४४. | मार्गदर्शन वृत्ती | गद्य | केशवसुतांचे एक पत्र, ४ |
| ४५. | मानवतावाद | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| | | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| | | पद्य | अर्ध, ६ |
| ४६. | मातृभूमी प्रेम | गद्य | कोकणातील मित्र, ११ |
| | | पद्य | ते मऱ्हाटी बोलिन, १ |
| | | पद्य | क्रांतीचा जयजयकार, १४ |
| ४७. | माणुसकी संवर्धन | पद्य | स्वर्गातून, १९ |
| ४८. | मातृप्रेम | पद्य | मैत्रीन नको महिन्यांनी, ११ |
| | | पद्य | माँ ये काठिन्य माझे, १२ |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| ४९. | मृत्यूच्या अनिवार्यतेची जाण | पद्य | जन पळभर म्हणतिल, ८ |
| ५०. | राष्ट्रीय एकात्मता | गद्य | जीवन, ११ |
| ५१. | लोकशाही जीवननिष्ठा | गद्य | देशभक्ती आणि राजनिष्ठा, ३ |
| ५२. | लोकशिक्षण | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| ५३. | वाक्चातुर्य | गद्य | वाक्चातुर्य, २ |
| ५४. | विनयशीलता | गद्य | केशवसुतांचे एक पत्र, ४ |
| ५५. | विनोदआस्वाद | गद्य | तुम्ही आम्ही का हसतो, ५ |
| ५६. | विश्वबंधुत्व | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| ५७. | विशाल अंतःकरण | गद्य | समुद्र आणि तारा, ८ |
| | | पद्य | मंजु ये काठिण्य नाही, १२ |
| | | पद्य | स्मशान, १८ |
| ५८. | विचारसामर्थ्य | गद्य | माकडांपासून शिक्षण घ्यावे, ९ |
| ५९. | विज्ञानदृष्टी | गद्य | अनीतीचे राज्य, १५ |
| ६०. | विशुद्ध भावना वृद्धी | पद्य | लोकगाणी, ४ |
| ६१. | विज्ञानयुगातील जीवनाची जाण | पद्य | पाखरांनो तुम्ही, ११ |
| ६२. | विद्याप्रेम | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| | | पद्य | सरस्वतीची भूपाळी (काव्यानंद), २ |
| ६३. | व्यवहारज्ञान | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| ६४. | व्यावसायिक कौशल्य | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| ६५. | सत्यनिष्ठा | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| | | गद्य | न्याय, १२ |
| | | गद्य | जनतेचे राज्य, १५ |
| | | पद्य | अर्घ्य, ६ |
| ६६. | संयमशीलता | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| ६७. | सर्वांगीण विचार पद्धती | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| ६८. | समाजचिंतन | गद्य | मातृभाषेतून शिक्षण घ्यावे, १ |
| ६९. | सर्वधर्मसमभाव | गद्य | जनतेचे राज्य, १५ |
| ७०. | समूहगान | पद्य | ती कृष्णराजाची वेळ |
| | | पद्य | |
| ७१. | समानुभूती | पद्य | आईची आठवण, १० |
| ७२. | समूह जीवन आवड | पद्य | श्रमानुबंध, २० |
| ७३. | सौजन्य | पद्य | ती कृष्णराजाची वेळ, २ |
| ७४. | सौंदर्यास्वाद | पद्य | कुरआनील (काव्यानंद), १ |
| ७५. | स्वातंत्र्य प्रेम | गद्य | देशभक्ती आणि राजनिष्ठा, ४ |
| | | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |
| | | पद्य | भेटेन नऊ महिन्यांनी, ११ |
| ७६. | स्वाभिमानी बाणा | पद्य | |
| ७७. | स्वार्थत्याग | गद्य | समुद्र व तारा, ८ |
| ७८. | स्वाभिमान | गद्य | आपला मरणाहून मोठे, १ |
| ७९. | स्त्री पुरुष समानता | गद्य | माणसाची किंमत, १७ |
| | | गद्य | बीरबल, १९ |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|
| ८०. | शाश्वत दुःखाची जाण | गद्य | हेट, ११ |
| ८१. | शूरता | गद्य | अपेश मरणाहून वोखटे, १ |
| ८२. | हुंडा विरोध | गद्य | माणसाची किंमत, १७ |
| ८३. | ज्ञानोपासना | गद्य | शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ७ |
| ८४. | श्रमप्रतिष्ठा | गद्य | मानव्याचे स्वराज्य, ६ |

टीप : पाठांच्या नावापुढे पाठ क्रमांकाचे आकडे नोंदविलेले आहेत.

सारणी क्र. ४.४ वरून असे आढळून येते की 'कुमारभारती' इयत्ता १० वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकामध्ये असलेल्या गद्य १९, पद्य २२, काव्यानंद ३ या एकूण ४४ पाठांमधून ८४ मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत. मूल्यप्रकारानुसार मूल्यांची विभागणी सारणी क्र. ४.५ मध्ये केलेली आहे.

## सारणी क्र. ४.५

**कुमारभारती इयत्ता १० वीच्या पाठ्यपुस्तकातील मूल्यांची मूल्यप्रकारानुसार विभागणी**

| मूल्य प्रकार | मूल्यांची नावे |
|---|---|
| १) वैयक्तिक मूल्ये | १) अहंकार त्याग, २) अन्याय चीड, ३) आसक्ति त्याग, ४) आत्मपरीक्षण, ५) आत्मनिर्भरता, ६) क्रियाशीलता, ७) कृतज्ञता, ८) चिरंतनसुखशोध, ९) जीवननिष्ठा, १०) तत्परता, ११) तपस्वीता १२) तेजस्वीता, १३) तात्त्विक दृष्टी, १४) ध्येयनिष्ठा, १५) नवनिर्मिती क्षमता, १६) परखडता, १७) पारतंत्र्य त्याग, १८) प्रौढत्वानुभूती, १९) बुद्धीनिष्ठा, २०) भयमुक्ती, २१) मनोनिग्रह, २२) मनोधैर्य, २३) मनाचा मोठेपणा, २४) मार्गदर्शन वृत्ती, २५) दुर्दम्य आत्मशक्ती, २६) वाक्चातुर्य, २७) विनयशीलता, २८) विनोद आस्वाद, २९) विचार सामर्थ्य, ३०) विशुद्ध भावनावृत्ती, ३१) व्यवहारज्ञान, ३२) व्यावहारिक कौशल्य, ३३) संयमशीलता, ३४) सर्वांगीण विचारपद्धती, ३५) स्वचिंतन, ३६) स्वानुभूती, ३७) सौजन्य, ३८) स्वसामर्थ्य जाण, ३९) स्वार्थत्याग, ४०) स्वाभिमान, ४१) शूरता, ४२) श्रमप्रतिष्ठा, ४३) आत्मविश्वास, ४४) खोट्या प्रतिष्ठेचा तिरस्कार |

<u>सारणी क्र. ४.५</u> (पुढे चालू...)

| मूल्य प्रकार | मूल्यांची नावे |
|---|---|
| २) सामाजिक मूल्ये | १) अंधश्रद्धा निर्मूलन, २) क्रांतिनिष्ठा, ३) कौटुंबिक जिव्हाळा, ४) बंधुभाव, ५) राष्ट्रीय एकात्मता, ६) प्रवाहित दलाता, ७) लोकशाही जीवननिष्ठा, ८) लोकशिक्षण, ९) विज्ञान दृष्टी, १०) विज्ञानयुगातील मोजणीविषयी जाण, ११) सर्वधर्मसमभाव, १२) समूहजीवन आनंद, १३) स्त्री-पुरुष समानता, १४) हुंडा विरोध. |
| ३) नैतिक मूल्ये | १) न्यायनिष्ठा, २) सत्संगत |
| ४) सांस्कृतिक मूल्ये | १) आप्त प्रेम, २) इतिहास प्रेम, ३) [illegible] जीवन-दृष्टी, ४) दया, ५) निसर्ग प्रेम, ६) भावसौंदर्य जाण, ७) मूकदया, ८) माणुसकी संवर्धन, ९) मातृप्रेम, १०) देशप्रेम, ११) मातृभूमी प्रेम, १२) विश्वबंधुत्व, १३) विशाल अंतःकरण, १४) विद्याप्रेम, १५) सौंदर्यास्वाद, १६) स्वातंत्र्य प्रेम, १७) ज्ञानोपासना |
| ५) आध्यात्मिक मूल्ये | १) त्यागनिष्ठा, २) निष्काम सेवा, ३) परमेश्वर भक्ती, ४) पावनता धर्म, ५) मृत्यूच्या अपरिहार्यतेची जाण, ६) सत्यनिष्ठा, ७) शाश्वत दुःखाची जाण |

मूल्यांच्या पाच प्रकारांनुसार विचार करता १० वीच्या कुमारभारती या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचे प्रमाण खालील सारणी क्रमांक ४.६ मध्ये नोंदविले आहे.

**सारणी क्र.४.६**

**मूल्यांच्या प्रकारांनुसार प्रतिबिंबित मूल्यांचे शेकडा प्रमाण**

**१० वी 'कुमारभारती'**

| अनु. | मूल्य प्रकार | मूल्य संख्या | मूल्यांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वैयक्तिक मूल्ये | ४५ | ५२.०० टक्के |
| २. | सामाजिक मूल्ये | १४ | १८.०० टक्के |
| ३. | नैतिक मूल्ये | २ | २.०० टक्के |
| ४. | सांस्कृतिक मूल्ये | १६ | १९.०० टक्के |
| ५. | आध्यात्मिक मूल्ये | ७ | ८.०० टक्के |
| | एकूण | ८४ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ४.६ वरून असे आढळून येते की, कुमारभारती इयत्ता १० वी या पाठ्यपुस्तकात १) वैयक्तिक मूल्ये, ५२ टक्के, २) सामाजिक मूल्ये १८ टक्के, ३) नैतिक मूल्ये २ टक्के, ४) सांस्कृतिक मूल्ये १९ टक्के आणि ५) आध्यात्मिक मूल्ये ८ टक्के आहेत.

पाठ्यपुस्तकातील पाठांमधून वैयक्तिक मूल्यांना तसेच सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांना दिलेले प्राधान्य महत्त्वपूर्ण दिसते. नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचे प्रमाण अल्प दिसत असले तरी वैयक्तिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांच्या संक्रमणातून व्यक्तिमत्त्वाचा नैतिक आणि आध्यात्मिक विकास होत राहात असतो हे ध्यानात घेतले पाहिजे.

## ४.६ समारोप :

या प्रकरणामध्ये इयत्ता ९ वी व १० वीच्या प्रथम भाषा मराठीच्या ` कुमारभारती ` या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे पाठानुसार व मूल्यनिहायानुसार वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकांमध्ये कोणकोणती व कोणकोणत्या प्रकारची मूल्ये अंतर्भूत झालेली आहेत याचे सम्यक चित्र उभे राहिले.

पुढील प्रकरणात संशोधन सामग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) म.बा. कुंडले, शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र, पुणे : श्री विद्या प्रकाशन, १९७४ या ग्रंथामध्ये नोंदविल्याप्रमाणे.

२) Radhakrishnan (Chairman), Report of the University Education 1948. New Delhi : Ministry of Education, 1962, p.

३) Mudaliyar (Chairman), Report of the Secondary Education Commission, 1952-53, New Delhi : Ministry of Education

४) वि.ह. सहस्त्रबुद्धे, शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन, पुणे : साधना प्रकाशन, १९७५, पृ. ४८ वर नोंद केल्यानुसार.

५) Kothari D.S. (Chairman), Report of the Education Commission (1964-66) Education and National Development, p. 7, New Delhi : N.C.E.R.T., Reprint 1971.

६) नागपुरे व.रा. (संपादक), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ - शैक्षणिक आव्हानाकडून कृतिकार्यक्रमाकडे पुणे : म.रा.शै.सं.प्र.प., १९८७.

७) Goyal B.R., Documents on Social, Moral and Spiritual Values in Education, New Delhi : N.C.E.R.T., 1979.

८) अभ्यासक्रम - इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी, पुणे : सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, १९८२.

९) तत्रैव.